# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Shirpur**

**Date of Good Work done** :- **02/09/2022**

**Brief of the work done :-**

पो.स्टे.शिरपूर पोलिसांची अवैध गुटखा विक्री करणारांवर धाड ; 1.25 लाखांचा मुद्देमाल जप्त.

लोकमत

## बंद दुकानातून सव्वा लाखाचा गुटखा जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर** : शिरपूर पोलीस स्टेशन हद्दीतील चांडस येथे बसथांबा ते डोणगांव रोडवर एका शटरबंद दुकानात शासनाने प्रतिबंधित केलेला सव्वा लाखांचा गुटखा जप्त करण्यात आला. गुटखा जवळ बाळगणारा अक्षय जिरवणकर हा फरार असून, पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

खात्रीलायक माहितीवरून शिरपूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुनील वानखेडे यांनी पथक गठीत करून ३० ऑगस्टच्या रात्री अक्षय जिरवणकर याच्या ताब्यातील बंद दुकानावर धाड टाकली. त्याठिकाणी विमल पान मसाला व व्ही. वन. तंबाखू आढळून आला.



मुद्देमाल जप्त करण्यात आला. मात्र, अक्षय जिरवणकर हा फरार होण्यात यशस्वी झाला असून, पोलीस त्याचा शोध घेत आहेत. या कारवाईत पोलीस निरीक्षक सुनील वानखेडे यांच्यासह सहायक पोलीस निरीक्षक महादेव भारसाकळे, जगदीश बांगर, संतोष पाईकराव, गौरीशंकर तेलंगे, मनोज ब्राम्हण आदिंनी सहभाग नोंदविला.

> जप्त करण्यात आलेला गुटखा अक्षय महादेव जिरवणकर याचा असून, आरोपी फरार आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाकडे गुटखा पाठविण्यात आला. अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल. नागरिकांनी परिसरात कुठेही अवैध कृत्य होत असल्यास किंवा प्रतिबंधित साहित्य असल्यास त्याची माहिती पोलिसांना द्यावी.
>
> **- सुनील वानखेडे,**
> ठाणेदार, शिरपूर जैन